TITLE-CODE:- MAHMAR52789

# आपला मराठी टाइम्स

संपादक : अनिल राजाराम पवार कार्यकारी संपादक: मुकेश आर्मा देवेंद्र APLA MARATHI TIMES

वर्ष : १ ● अंक : ३२ ● साप्ताहिक ● मुंबई ● भाषा : मराठी ● सोमवार : ५ ते ११ ऑगस्ट २०२४ ● पृष्ठ - ८ ● मुल्य : ६ रुपये

## गटारीची पार्टी पडली महागात, कारसह पाच मित्र पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले, अन् मग...

**शहापूर :** ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात तानसा धरण क्षेत्रात गटारी निमित्त दारू पार्टी करणे मित्रांच्या जीवावर बेतल्याची खळबळकनक घटना समोर आली आहे. पाच मित्र कारमध्ये बसून धरणाचा मुख्य प्रवाह असलेल्या गेटजवळ गटारीची पार्टी करत होते. त्याच सुमाराला अचानक तानसा धरणाचे स्वयंचलित २४ दरवाजे उघडले आणि नदीपात्रात पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात झाला. या प्रवाहात हे पाचही मित्र कारसह नदीच्या प्रवाहात वाहून जाऊ लागले. त्यापैकी एकाच मृतदेह नागरिकांच्या मदतीने बाहेर काढण्यात आला आहे. तर, दुसरा बेपत्ता झाला आहे. यावेळी तीन मित्रांनी कारमधून उड्या मारून आपला जीव वाचवला आहे. गणपत चिमाजी शेलवंदे (रा.कल्याण) असे या दुघटनेत मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवार आणि रविवार सुट्टी असल्याने त्यातच श्रावण महिना सुरू होण्यापूर्वी गटारी साजरी करण्यासाठी हजरो पर्यटक निर्सगाच्या सानिध्यात पार्टीसाठी येत असतात. त्यात कल्याणहून



शहापूर तालुक्यातील तानसा अभयारण्यात गटारीची पार्टी साजरी करण्यासाठी पाच जण कारने गेले होते. हे मित्र ३ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास पार्टी करण्यासाठी तानसा धरणाच्या गेट नंबर एकच्या खाली कारमध्ये बसून पार्टी करत होते. तेवढ्यात अचानक तानसा धरणाचे स्वयंचालित २४ दरवाजे उघडल्याने नदीपात्रात पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात झाला आणि हे पाच जण कारसह नदीच्या प्रवाहात वाहून जाऊ लागले. यापैकी तिघांनी कार बाहेर उड्या मारल्याने त्यांचा जीव वाचला. मात्र, दोनजण गाडीत अडकले होते. यापैकी गणपत चिमाजी शेलकंदे यांचा कारमध्ये गुदमरून मृत्यू झाला. त्यांचा मृतदेह स्थानिक नागरिकांच्या मदतीने बाहेर काढण्यात आले आहे. मात्र, एकजण आद्यपही बेपत्ता असून याचा शोध सुरू आहे. दरम्यान, पावसाळ्यात धरण, तलाव, नदी, धबधबे, या ठिकाणी पर्यटकांना पिकनिकसाठी जिल्हा प्रशासनाकडून खबरदारीचा उपाय म्हणून बंदी घालती आहे. तरी सुद्धा काही पर्यटक जीव धोक्यात घालून अशा ठिकाणी पार्टीसाठी जात असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे गेल्या आठ दिवसांपासून धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस पडत असल्याने धरणातून पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाण सुरू आहे. यामुळे नदी काठच्या ग्रामस्थांना प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा दिला असताना काही अतिउत्साही पर्यटक मात्र धरण, धबधब्यांच्या ठिकाणी जाऊन स्वत:चा जीव धोक्यात घालताना दिसत आहेत. या घटनेची नोंद शहापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## श्रीनिवास राव यांच्यामुळे तिघांना नवे आयुष्य

### नेहरू सेंटरच्या वरिष्ठ सहाय्यकांचे अवयवदान

**मुंबई :** रस्ता ओलांडताना भरधाव दुचाकीने धडक दिल्यानंतर गंभीर जखमी झालेले नेहरू सेंटर कलादालनाचे वरिष्ठ सहाय्यक श्रीनिवास राव यांची सहा दिवस सुरू असलेली मृत्यूशी झुंज गुरुवारी संपली. जसलोक रुग्णालयात त्यांची प्राणज्योत मालवली. मात्र,



राव यांची अवयवदानाची प्रबळ इच्छा जाता जाता तिघांना नवे आयुष्य देऊन गेली. गेली तीन दशके राव कलादालनाचे ज्येष्ठ सहाय्यक नेहरू सेंटरच्या कलादालनात कार्यरत होते. शिस्तप्रिय, मनमिळावू स्वभावाचे राव कलाकारांना मदतीचा हात पुढे करत २६ जुलैला रात्री नऊच्या सुमारास वरळीच्या अविग्ना इमारतीजवळ रस्ता ओलांडताना राव यांना भरधाव दुचाकीने धडक दिली. यात राव यांच्या दोन्ही पायांना फ्रॅक्चर झाले. तसेच त्यांना इतरही जखमा झाल्या. त्यांना प्रथम नायर रुग्णालयात, नंतर जसलोक रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांना चांगला प्रतिसाद देणारे राव यांची प्रकृतीनंतर खालावली. दोन दिवसांनी त्यांना ब्रेन डेड घोषित केले होते. मृत्यूनंतर राव यांची अवयव दानाची इच्छा त्यांचे कुटुंबीय, जसलोक रुग्णालयातील डॉक्टर आणि प्रत्यारोपण समन्वयकांनी प्रत्यक्षात आणली. त्यांचे यकृत, दोन्ही मूत्रपिंडांसोबत कोर्निया टिशू व टेंडन दान करण्यात आले.

## अंमली पदार्थ तस्करीतील आरोपी कल्याणच्या बाजारपेठ पोलिसांकडून अटक

**मुंबई :** अंमली पदार्थांची तस्करी करणारा एक आरोपी गेल्या चार वर्षापासून फरार होता. कल्याणमधील बाजारपेठ पोलीस चार वर्षापासून या तस्कराच्या मागावर होते. अखेर कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात बाजारपेठ पोलिसांनी बुधवारी सापळा रचून या तस्कराला अटक केली. सैफ सिकंदर बुरहान (३८, रा. गुलमोहर अपार्टमेंट, राबोडी, ठाणे) असे आरोपीचे नाव आहे. तो मेफेड्रोन (एम. डी.) या अंमली पदार्थांची तस्करी करायचा. चार वर्षापूर्वी या तस्करीप्रकरणी बाजारपेठ पोलिसांनी सैफ विरुध्द गुन्हा दाखल केला होता. त्याला याप्रकरणात अटक करण्यासाठी पोलिसांनी तयारी केली असतानाच, तो कल्याण शहर परिसरातून फरार झाला होता. पोलिस त्याचा चार वर्ष शोध घेत होते. मुंबई, ठाणे, रायगड परिसरात पोलिसांनी त्याचा शोध घेतला होता. तो मिळून येत होता. बाजारपेठ पोलीस ठाण्याचे हवालदार सचिन साळवी यांना अंमली पदार्थ तस्करीतील आरोपी सैफ बुरहान हा बैलबाजारातील




कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीजवळ येणार आहे अशी गुप्त माहिती मिळाली. तातडीने बाजारपेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेशसिंग गौड यांच्या मार्गदर्शनाखाली शोध पथकाचे साहा□क पोलीस निरीक्षक नवनाथ रुपवते, या पथकाचे साहा□क पोलीस उपनिरीक्षक सुरेश पाटील, हवालदार सचीन साळवी, हवालदार प्रेमा बागुल, अरूण आंधळे यांच्या पथकाने बाजार समिती इमारत परिसरात सापळा लावला. ठरल्या वेळेत सैफ बाजार समिती आवार परिसरात येताच सापळा लावून बसलेल्या पोलिसांनी त्याच्यावर झडप घालून त्याला अटक केली. आपण पोलिसांच्या जाळ्यात अडकलो आहोत, याची चाहूल लागताच त्याने पोलिसांच्या तावडीतून निसटण्याचा प्रयत्न केला. पण पोलसांनी त्याला जागीच जेरबंद केला. कल्याण परिसरातील अंमली पदार्थाची अनेक प्रकरणे सैफच्या अटकेने उलगडणार आहेत. साहायक पोलीस निरीक्षक नवनाथ रूपवते या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# आता शाखांच्या फलकांवरील धनुष्यबाण हटवा अन्:, उद्धव ठाकरेंचे पदाधिकाऱ्यांना आदेश!

**पुणे:** पुण्याच्या पदाधिकारी मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना संबोधित केले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत शिवसेनेची आणि पर्यायाने महाविकास आघाडीती रणनीती काय असणार यावर त्यांनी प्रकाश टाकला तर, सत्ताधारी महायुती सरकारवर त्यांनी सडकून टीका केली. यावेळी त्यांनी ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांना महत्त्वाचे आवाहन करण्यात आले. शाखा शाखातील बोर्डांवर जी धनुष्यबाणाची निशाणी आहे ती हटवा आणि त्या ठिकाणी मशाल चिन्ह लावा, असे आदेश माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिली. महाराष्ट्रातील अनेक शिवसेनेच्या शाखांवरून वाद सुरू आहेत. शिंदे आणि ठाकरे गट या शाखांसाठी आमने सामने आलेले आहेत. त्यातच, ठाकरेंनी आता असे आदेश दिल्याने अनेक शाखांमध्ये वाद होण्याची शक्यता आहे. दोन दिवसांपूर्वी मुंबईतल्या सभेत बोललो की, एक तर तू राहशील किंवा मी राहिल. माझ्या पायाशी कलिंगड ठेवलेलं होतं. त्यामुळे काही जणांना वाटलं मी त्यांना आव्हान दिलं. मी कोणत्याही ढेकणाला आव्हान देत नाही. मी म्हणजे कोण आणि तू म्हणजे




कोण? याची संकल्पना उद्धव ठाकरे यांनी सांगितली. मी म्हणजे माझा संस्कारी महाराष्ट्र आणि तू म्हणजे महाराष्ट्रावर दरोडे टाकणाऱ्या दरोडेखोरांचा पक्ष. ढेकणाला कधी आव्हान दिलं जात नाही, ढेकणं चिरडायची असतात. कुणीतरी हे आव्हान स्वत:वर घेतलं. त्यानं सांगितलं माझ्या नादाला लागू नका. मी म्हणतो, तुझ्या नादाला लागण्याएवढ्या किंमतीचा तू नाहीच आहेस, अशी टीका शिवसेना उबाठा गटाचे नेते उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर केली. पुण्यामध्ये उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेनेच्या पुण्यातील पदाधिकाऱ्यांचा मेळावा संपन्न झाला. यावेळी त्यांनी भाजपावर पुन्हा एकदा टीकास्त्र सोडले. बऱ्याच वर्षांनंतर मी पुण्यात येत आहे. यापुढे लढाई मैदानात होणार, हॉलमध्ये होणार नाही, असेही आव्हान त्यांनी यावेळी दिले. मुनगंटवारांनी नाघनखे आणली आहेत. पण अहो मुनगंटीवार, नखाच्या मागे वाघ असतो ना तेव्हा त्या वाघनखांना अर्थ असतो. त्या वाघनखांनी अफजल खानाचा कोथळा काढलेला आहे की नाही हा विषय वेगळा आहे. पण त्या नखाच्या मागे शिवाजी राजा म्हणून वाघ होता. म्हणून त्या नखाला महत्त्व आहे. त्या नखाच्या मागे मुनगंटीवार असतील तर वाघनखे आणि मुनटंगीवार कुठेतरी जुळतंय का? असा बोचरा सवालही त्यांनी उपस्थित केला.

# अधिक किंमतीत रक्त विकणाऱ्या पेढ्यांवर कारवाई, १ कोटी रुपयांची दंड वसुली, हिंदूजा रुग्णालयाचा दोन वर्षांचा दंड थकीत

**मुंबई :** रक्तपेढ्यांनी अतिरिक्त किंमतीत रक्त विकल्याप्रकरणी रक्त संक्रमण परिषदेने (एसबीटीसी) १ कोटी ३२ लाख ९२ हजार रुपये दंडापोटी वसूल केले आहेत. मुंबईतील २१ खासगी रुग्णालयांच्या रक्तपेढ्यांकडून ही रक्कम वसूल करण्यात आली आहे. मात्र एका खासगी रुग्णालयाने दोन वर्षे उलटली तरी दंडाची रक्कम भरण्यास टाळाटाळ केल्याचे माहिती अधिकारातून उघड झाले आहे. रुग्णांना अल्पदरात रक्त उपलब्ध व्हावे यासाठी केंद्र सरकारच्या सूचनेनुसार राज्य सरकारच्या राज्य रक्त संक्रमण परिषदेने (एसबीटीसी) रक्ताचे शुल्क निर्धारित केले होते. मात्र खासगी रुग्णालयाकडून त्याचे उल्लंघन होत असल्याने राज्य सरकारने २०१८ मध्ये अतिरिक्त शुल्क आकारणाऱ्या रक्तपेढ्यांवर चार पट दंड आकारण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र त्यापूर्वी या नियमाचे उल्लंघन केलेल्या रक्तपेढ्यांचा दंडही थकला असल्याचे माहिती अधिकारातून उघडकीस आले आहे. एसबीटीसीने २०१४ ते २०१८ या कालावधीत अतिरिक्त किंमतीत रक्त देणाऱ्या २१ रक्तपेढ्यांकडून दंडापोटी १ कोटी ३२ लाख ९२ हजार वसूल केले. त्यात सर्वाधिक दंड हा हिंदूजा रुग्णालयाकडून ३३ लाख ३० हजार रुपये इतका दंड वसूल केला आहे. त्याखालोखाल जसलोक रुग्णालयाकडून १७ लाख ३७ हजार रुपये, कोकीलाबेन



रुग्णालय १४ लाख ७२ हजार रुपये, मुंबई रुग्णालय १२ लाख ६२ हजार रुपये, फोर्टीस रुग्णालय ९ लाख ३४ हजार रुपये इतके दंड वसूल करण्यात आले आहेत. मात्र हिंदूजा रुग्णालयाच्या एकूण दंडाच्या रकमेपैकी त्यांनी फक्त ३३ लाख भरले असून उर्वरित १५ लाख ७३ हजार ९३५ रुपयांचा दंड दोन वर्षांपासून भरलेला नाही. हा दंड भरण्यासाठी एसबीटीसीकडून वारंवार पाठपुरावा करण्यात येत असूनही त्याला प्रतिसाद मिळत नसल्याचे माहिती अधिकारातून उघडकीस आले आहे. एसबीटीसीने आकारलेल्या दंडामध्ये थॅलेसेमिया सारख्या रुग्णांना मोफत रक्त दिलेल्या रक्ताचा तसेच लेखा परीक्षकांनीही काही दंड पुन्हा आकारला असल्याचा दावा हिंदूजा रुग्णालयाने केला होता. मात्र एसबीटीसीने झालेली चूक सुधारल्यानंतर सुधारित दंडापैकी १५ लाख रुपये रुग्णालयाने भरले नसल्याचे माहिती अधिकारात मिळालेल्या उत्तरातून दिसते आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते चेतन कोठारी यांनी ही माहिती मागितली होती. आकारलेल्या अतिरिक्त शुल्काच्या रकमेवर २० टक्क्यांपेक्षा अधिक दंड आकारणे अपेक्षित होते. हिंदुजा आणि एसबीटीसी यांच्यातील हे प्रकरण मागील दोन वर्षांपासून प्रलंबित आहे. त्यामुळे आता एसबीटीसीने या दंडाच्या रकमेवर व्याज आकारून त्याची वसूली करावी, असे कोठारी यांनी सांगितले. पी.डी. हिंदुजा रुग्णालय हे दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी ओळखले जाते. उच्च दर्जाची आरोग्य सेवा पुरवण्यावर रुग्णालयातर्फे नेहमीच भर दिला जातो. त्यासाठी सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे आणि शिफारशींचे संबधित अधिकाऱ्यांकडून काटेकोरपणे पालन केले जाते. त्यानुसार राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या सर्व नियमांचे नेहमीच पालन केले असून, त्यांना सहकार्य केले आहे. रुग्णालयाच्या सहकाऱ्याबद्दल परिषदेकडून नेहमीच समाधान व्यक्त केले जात असल्याचे हिंदुजा रुग्णालयाच्या प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# महामार्गावर हायड्रोजन गॅस सिलेंडर वाहून नेणारा ट्रक उलटला, वसई फाट्याजवळ पहाटे झाला अपघात

**वसई:** मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वसई फाट्याजवळ हायड्रोजन सिलेंडर वाहून नेणाऱ्या ट्रकला अपघात झाला. शनिवारी पहाटे तीनच्या सुमारास गुजरात दिशेच्या मार्गावर ही घटना घडली. यात चालक जखमी झाला आहे, तर दुसरीकडे सिलेंडर रस्त्यावर पडल्याने आग लागली होती. मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरून गुजरातच्या दिशेने जी जे १२ बी वाय २२५५ या क्रमांकाचा ट्रक हायड्रोजन सिलेंडर घेऊन निघाला होता. मात्र वसई फाट्याजवळ पोहोचताच वाहन



चालकाचा गाडीवरील ताबा सुटला आणि थेट दुभाजकाच्या मध्ये जाऊन उलटला. यावेळी त्यात असलेले सिलेंडर हे मुख्य रस्त्यावर पडले अचानकपणे आगही लागली होती. तातडीने पालिकेच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले होते. त्यांनी अग्निबंबाच्या साहायाने आगीवर नियंत्रण मिळविले. कोणत्याही प्रकारची जीवितहानी होऊ नये यासाठी मुंबई व गुजरात वहिनी वरील सर्व वाहतूक सुरक्षित अंतरावर्ती थांबवून ठेवण्यात आली होती अशी माहिती चिंचोटी केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल चिंतामण यांनी दिली आहे. आग नियंत्रणात आल्यानंतर अपघातग्रस्त वाहन व रस्त्यावर पडलेले सिलेंडर क्रेनच्या सहायाने बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्याचे काम सुरू आहे. या घटनेमुळे महामार्गावरील वाहतूक विस्कळीत होऊन वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे.

# भारतीय कामगार सेनेच्या प्रयत्नांना यश

## ४०२ कर्मचाऱ्यांना सेवा अंतर्गत आश्वाशित प्रगती योजना लागू

**मीरा भाईंदर:** भारतीय कामगार सेनेच्या मीरा-भाईंदर महानगरपालिका कर्मचारी संघटनेने गेले चार ते पाच वर्ष मीरा-भाईंदर महानगरपालिकेतील प्रशासनाकडे सातव्या वेतन आयोगाच्या सेवा कार्य काळामध्ये १०,२०,३० वर्षाच्या नियमित सेवेनंतरची तीन लाभांची सुधारित सेवा अंतर्गत आश्वाशित प्रगती योजना अंमलबजावणी होत असते ह्या माध्यमातून कर्मचारी संघटनेचे मीरा-भाईंदर महानगरपालिका युनिटचे अध्यक्ष स्व.गोविंद परब तसेच भारतीय कामगार सेना चिटणीस सुनील कळेकर व पूर्ण युनिटचे पदाधिकारी व सदस्य यांनी सतत अथक प्रयत्न केले तसेच उबाठा.शिवसेना नेते, खासदार, गटनेते, माजी केंद्रीय मंत्री,भा.का.सेनेचे अध्यक्ष.मा अरविंद सावंत तसेच कार्याध्यक्ष अजित साळवी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले अनेकदा संघटनेने आंदोलनाचा पवित्रा घेऊन महानगरपालिका प्रशासनाशी अनेक वेळा बैठकी घेऊन सदर कर्मचार्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा केल्याने अखेर दिनांक २३ जुलै २०२४ रोजी महानगरपालिकेच्या उच्चस्तरीय अधिकारी बैठकीमध्ये सदर नियमित सेवेनंतर अंतर्गत आश्वाशित प्रगती योजना या अनुषंगाने एकूण ४०२ अधिकारी/ कर्मचारी यांना हा लाभ मिळण्यासाठी व मान्यता मिळण्यासाठी मीरा-भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त संजय काटकर (भा.प्र.से), अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त-मुख्यालय रवी पवार, मुख्य लेखा परीक्षक सुधीर नाकाडी, शहर अभियंता दीपक खांबित यांनी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले सदर बैठकीमध्ये झालेल्या निर्णय हा भारतीय कामगार सेनेचे मीरा-भाईंदर महानगरपालिका कर्मचारी संघटनेच्या युनिटचे नवनिर्वाचित अध्यक्ष मिलिंद पवार, खजिनदार किरण पाटील,व भारतीय कामगार सेनेचे महाराष्ट्राचे चिटणीस सुनील कळेकर ह्या सर्व पदाधिकाऱ्यांना ही माहिती देण्यात आली त्यामुळे मीरा-भाईंदर महानगरपालिका मधील कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# मी जिवंत नसेन; नातेवाईकाला मेसेजद्वारे पाठवली बँक आणि मालमत्तेची माहिती, मग पत्नीची हत्या करून :गोरेगावातील घटनेने खळबळ!

**मुंबई :** मुंबईतील गोरेगावात खळबळजनक घटना घडली आहे. पत्नीची हत्या करून पतीने इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्या केली आहे. याप्रकरणी पोलिसांकडून तपास सुरू झाला असून प्राथमिक तपासातून अनेक खुलासे समोर आले आहेत. गोरेगावातील किशोर पेडणेकर आणि राजश्री पेडणेकर असं या मृत दाम्पत्याचं नाव आहे. या घटनेतील पत्नीचा मृतदेह खोलीत तर पतीचा मृतदेह इमारतीच्या आवारात सापडला. त्यामुळे पत्नीची हत्या करून पतीने इमारतीवरून उडी मारल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. पती सेल्समन तर, पत्नी फिजिओथेरपिस्ट होती, असंही पोलिसांनी सांगितलं. घटनेची माहिती मिळताच गोरेगाव पोलिसांनी या दोघांनाही रुग्णालयात दाखल केलं असता, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. याबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलीस उपायुक्त आनंद भोईटे यांनी दिली आहे. आत्महत्या करण्यापूर्वी किशोर पेडणेकर यांनी एका नातेवाईकाला मेसेज करून त्यांची बँक खाती, मालमत्तेची माहिती दिली. तसंच दिल्लीत राहणाऱ्या मुलाला फ्लाईटचं तिकीट पाठवून रात्री ९ पर्यंत मुंबईत येण्यास सांगितलं, असं पोलीस तपासातून समोर आलं आहे. किशोर पेडणेकर यांच्या आत्महत्येचा तपास पोलीस करत आहेत. पोलिसांनी संबंधित प्रकरणात त्यांच्या मुलाला मुंबईला बोलावलं असून त्याचा जबाब नोंदवण्यात येणार आहे. प्राथमिक तपासात प्रथम महिलेचा खून झाला असावा आणि नंतर पतीनं आत्महत्या केल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.




पोलिसांनी सांगितले की, तपासादरम्यान असं आढळून आलं की किशोर पेडणेकर हे तणावात आणि इतर काही आजारांनी त्रस्त होते. डॉ. राजश्री पेडणेकर या मालाड इथल्या एका आरोग्य संस्थेत प्रॅक्टिस करत होत्या. त्यांचा मुलगा दिल्लीत राहतो. एवढं मोठं पाऊल उचलण्याआधी किशोर पेडणेकर यांनी एक मेसेजही पाठवला आहे. ज्यामध्ये त्यांना मालमत्तेचा तपशील आणि नॉमिनीचं नाव पाठवलं आहे. याबाबत अधिक माहिती देताना सहाय्यक आयुक्त रेणुका बागडे म्हणाल्या, २ ऑगस्ट रोजी गोरेगाव पश्चिम येथून फोन आला की एक मृतदेह सापडला आहे. गोरेगाव पोलीस तिथे पोहोचले आहेत. सारस्वत बँकेच्या एटीएम शेजारी हा मृतदेह सापडला. मृतदेह घेऊन रुग्णालयात नेलं असता मृत घोषित करण्यात आलं. नंतर त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेण्याकरता सोसायटीतील लोकांशी संपर्क साधला गेला. त्यांच्या पत्नीशीही संपर्क साधण्याचा प्रयत्न झाला. परंतु, त्यांची पत्नी फोन उचलत नव्हती. मृतदेहाच्या गळ्यात तीन चाव्या होत्या. या चाव्यांच्या सहाय्याने पोलिसांनी मृताच्या नातेवाईकांनी दार उघडण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पोलिसांना त्यांची पत्नी मृतावस्थेत आढळली. त्यांचा गळा दाबून हत्या केल्याचं समोर आलं. ज्यावेळी हे दोन्ही मृतदेह सापडले त्यानंतर जो तपास झाला त्यानुसार किशोर पेडणेकर यांनी पत्नीचा चादरीच्या सहाय्याने गळा दाबून हत्या केली असल्याचं निष्पन्न झालं. गेले दोन-अडीच वर्षे ते तणावात होते. तसंच, त्यांना उच्च मधुमेहही होता. हे कृत्य करण्याआधी सकाळी चार वाजता त्यांनी एका नातेवाईकाला त्यांच्या बँक आणि मालमत्तेची संपूर्ण माहिती दिली होती. तसं, मी जिवंत नसेन असंही त्यांनी या मेसेजमध्ये लिहिलं होतं. सीसीटीव्ही फुटेज तपासले असता किशोर पेडणेकर यांनी पाचव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. त्यांचा मुलगा दिल्लीला कामाला आहे. तपासात असंही आढळली की आत्महत्यापूर्वी नातेवाईकाचं आणि मुलाचं तिकिट बुक केलं होतं. त्यानंतर मेसेजही केला होता की त्याला इथ आणा. मुलाशी अजून संपर्क झाला नसून तपास सुरू आहे, असंही त्यांनी पुढे सांगितलं.


## राजकीय खटले मागे; मराठा आंदोलनाचा फटका बसल्याने राज्य सरकारची खबरदारी



**मुंबई :** मराठा आंदोलनाची धग लोकसभा निवडणुकीत बसलेल्या महायुती सरकारने आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठा आंदोलकांसह विविध राजकीय खटले मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील शासकीय आदेश शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात आला. मराठा आरक्षण तसेच मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या मागणीवरून राज्यात गेल्या काही काळापासून सुरू असलेल्या राजकीय आणि सामाजिक आंदोलनातील मराठा कार्यकर्त्यांवर दाखल झालेले खटले मागे घेण्याची मागणी मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केली होती. येत्या ३१ ऑगस्टपर्यंत आरोपपत्र दाखल होऊ शकेल असे खटले मागे घेण्याचे आदेश पोलिसांना देण्यात आले आहेत. राज्यात जून २०२२मध्ये महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर २० सप्टेंबरच्या शासन निर्णयाद्वारे राजकीय आणि सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याचा पहिला निर्णय घेत सत्ताधाऱ्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना दिलासा दिला होता. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली गेले वर्षभर आंदोलन सुरू आहे. ऑक्टोबर २०२३मध्ये या आंदोलनादरम्यान मराठवाड्यात हे आंदोलन हिंसक झाल्यानंतर दोन आमदारांच्या घरावर हल्ला आणि जाळपोळ करण्यात आली होती. त्यात पोलिसांनी मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांवर मोठ्या प्रमाणात गुन्हे दाखल केले होते. मात्र या हिंसाचाराशी मराठा आंदोलनाचा संबंध नसून आंदोलनाला बदनाम करण्यासाठी समाजकंटकांनीच हा हिंसाचार घडवून आणल्याचा दावा करीत खटले मागे घेण्याची मागणी मनोज जरांगे पाटील यांनी लावून धरली होती. हे खटले मागे घेतले नाहीत तर विधानसभा निवडणुकीत महायुतीविरोधात जाण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. त्याची दखल घेत सरकारने आता हे खटले मागे घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती गृह विभागातील सूत्रांनी दिली. मराठा आंदोलकांवरील खटले मागे घेण्याबाबत गृहविभागाने शासन निर्णय निर्गमित केला असून त्यात राजकीय आणि सामाजिक आंदोलनातील ज्या गुन्ह्यांमध्ये जीवितहानी झालेली नसेल तसेच खासगी वा सार्वजनिक मालमत्तेचे पाच लाखपेक्षा अधिक नुकसान झालेले नसेल अशा गुन्ह्यात ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत दोषारोपपत्र दाखल होतील असे खटले मागे घेण्याचे आदेश पोलिसांना देण्यात आले आहेत. पाच लाखांपर्यंतच्या नुकसानीचे खटले मागे घेताना संबंधितांनी नुकसानभरपाई भरण्याची लेखी संमती दिल्यास हे खटले मागे घ्यावेत.

## भिवंडीतील अनधिकृत टेलिफोन एक्स्चेंजवर एटीएसची कारवाई, २४६ सिमकार्डसह १९१ अँटीना जप्त, आरोपीला अटक

**मुंबई :** भिवंडीतून अनधिकृतपणे चालणाऱ्या टेलिफोन एक्स्चेंजवर राज्य दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) कारवाई केली आहे. या कारवाईत ९ सिम बॉक्स, विविध कंपन्यांचे २४६ सिम कार्ड, ८ वायफाय राउटर सिमबॉक्स चालविण्याकरीता वापरण्यात येणारे १९१ अँटीनासह विविध साहित्य जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी अनधिकृत टेलीफोन एक्स्चेंज चालविणाऱ्या जाफर बाबूउस्मान पटेल (४०) याला एटीएसने अटक केली आहे. बेकायदेशीर सिमबॉक्सच्या सहाय्याने अनधिकृत टेलिफोन एक्स्चेंज चालवले जात असल्याची माहिती ३१ जुलै रोजी एटीएसला मिळाली. त्या गोपनीय माहितीच्या आधारे एटीएसच्या अधिकाऱ्यांनी भिवंडीतील नवीन गौरीपाडा आणि रोशनबाग या ठिकाणी छापा टाकून अनधिकृत टेलिफोन एक्स्चेंजचा शोध घेतला. कारवाई दरम्यान दिनस्टार कंपनीचे ९ सिम बॉक्स,



विविध कंपन्यांचे २४६ सिम कार्ड, विविध कंपन्यांचे ८ वायफाय राउटर, सिमबॉक्स चालविण्याकरीता वापरण्यात येणारे १९१ अँटीना आणि सीमबॉक्स कायम कार्यान्वित रहावा यासाठी वापरण्यात येणारे इनव्हर्टर असा अंदाजे एक लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दीड वर्षापासून अनधिकृत टेलिफोन एक्स्चेंज सुरू होते. त्यामुळे भारत सरकारच्या दूरसंचार विभागाचे तीन कोटींचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. तेथून आखाती देशात दूरध्वनी करण्यात आले आहेत. याप्रकरणी एटीएसने पटेल याला ताब्यात घेत चौकशीनंतर अटक केली. तो त्याच्या साथीदारांच्या मदतीने अनधिकृत टेलीफोन एक्स्चेंज चालवत होता. दहशतवाद विरोधी पथकाने त्याच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३ (५) सह भारतीय टेलिग्राफ कायदा १८८५ मधील कलम ४, सह द टेलिकम्युनिकेशन अॅक्ट २०२३ चे कलम ४२ तसेच इंडियन वायरलेस टेलीग्राफी अॅक्ट १९३३ कलम ३ व ६ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# विद्याविहारमधील सोमय्या महाविद्यालयाला कारणे दाखवा नोटीस



**मुंबई :** महाराष्ट्र शासनाकडून अनुदान मिळत असतानाही मुंबई विद्यापीठाने ठरवून दिलेल्या शुल्कापेक्षा पाच पट अतिरिक्त शैक्षणिक शुल्क आकारत असल्याच्या तक्रारीवरून मुंबई विद्यापीठाने महाविद्यालयाला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. मुंबई विद्यापीठाशी संलग्न के. जे. सोमय्या कला व वाणिज्य, एस. के. सोमय्या कला, विज्ञान व वाणिज्य आणि के. जे. सोमय्या विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांना मुंबई विद्यापीठाने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. विद्यापीठाने ठरवून दिलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा पाच पट अधिकचे शुल्क घेण्यात येत असल्याची तक्रार महाविद्यालयाविरुद्ध करण्यात आली होती. महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे राज्य प्रमुख संघटक संतोष गांगुर्डे यांनी याबाबत तक्रार केली होती. या तक्रारीबाबत सात दिवसांत महाविद्यालय संलग्नता व विकास विभागातील उपकुलसचिवांकडे खुलासा सादर करावा, असे मुंबई विद्यापीठाने सोमय्या महाविद्यालयाला पाठविलेल्या कारणे दाखवा नोटीशीत नमूद केले आहे. राज्य शासन व विद्यापीठाच्या परवानगीशिवाय अतिरिक्त शुल्क घेणे हा भारतीय न्याय संहिता व भारतीय नागरिक सुरक्षा संहिता अंतर्गत फौजदारी गुन्हा आहे. वसूल केलेले अधिकचे शिक्षण शुल्क तातडीने विद्यार्थ्यांना परत करावे, असे महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे राज्य प्रमुख संघटक संतोष गांगुर्डे यांनी सांगितले. आमच्या महाविद्यालयांनी शैक्षणिक शुल्क आराखड्यात केलेल्या सुधारणा नियमांप्रमाणे आणि मुंबई विद्यापीठाच्या प्रक्रियेनुसारच आहेत. आमच्या कामकाजात पारदर्शकता राखण्यासाठी आणि विद्यार्थ्यांनी व पालकांनी आमच्यावर ठेवलेला विश्वास कायम ठेवण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. आमची महाविद्यालये तक्रारींत उपस्थित केलेल्या विविध मुद्द्यांबाबत विद्यापीठाकडे तपशीलवार उत्तर सादर करतील, असे सोमय्या विद्याविहार व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले आहे.

# महागड्या दुचाकी चोरणाऱ्या सराईत आरोपीला अटक



**मुंबई:** घराबाहेर पार्क केलेल्या महागड्या दुचाकी चोरून त्यांची विक्री करणाऱ्या एका सराईत आरोपीला ट्रॉम्बे पोलिसांनी अटक केली आहे. या आरोपीच्या ताब्यातून पोलिसांनी तीन दुचाकी हस्तगत केल्या असून पोलीस याबाबत अधिक तपास करत आहेत. ट्रॉम्बेच्या चिता कॅम्प परिसरात राहणारे अन्वर खान (२८) या तरुणाने त्याची दुचाकी ३० जुलैला घराजवळ उभी केली होती. मात्र त्याच रात्री चोरट्याने बनावट चावीच्या आधारे ती चोरून पोबारा केला. याबाबत खान यांनी ट्रॉम्बे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. परिसरातील काही सीसीटीव्ही चित्रण ताब्यात घेऊन पोलिसांनी पाहणी केली असता त्यात आरोपीचा चेहरा कैद झाला होता. त्यानुसार पोलिसांनी आरोपीची ओळख पटवून चिता कॅम्प परिसरातूनच त्याला अटक केली. फरदिन सयद (१९) असे आरोपीचे नाव असून तो त्याच परिसरातील राहणारा आहे. तपासात त्याने गुन्ह्याची कबुली देत, अशाच प्रकारे तीन दुचाकी चोरल्याची माहिती पोलिसांना दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून तीन दुचाकी हस्तगत केल्या असून पोलीस त्याच्याकडे याबाबत अधिक तपास करत आहेत.

# उपनिबंधक कार्यालयांच्या मनमानीमुळे सहकारी गृहनिर्माण संस्था हैराण! प्रशासक नियुक्ती, अपात्रतेच्या नोटिसांमध्ये अधिक रस

**मुंबई :** मुंबई, ठाणे, नवी मुंबईसह महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील (म्हाडा) उपनिबंधक कार्यालये सध्या प्रशासक नियुक्ती वा व्यवस्थापकीय समिती अपात्र करण्याच्या नोटिसांमध्ये अधिक रमली आहेत. जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचे जोरदार वारे वाहत असल्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील दोन गटातील भांडणात उपनिबंधक कार्यालये आपली आर्थिक पोळी चांगलीच भाजून घेत आहे. महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण संस्था कायद्यामुळे उपनिबंधकांना अमर्याद अधिकार दिले आहेत. त्यामुळे प्रशासक नियुक्तीसाठी असलेले कलम ७७ किंवा व्यवस्थापकीय समिती वा सदस्य अपात्र करण्यासाठी असलेले ७८ (अ) कलमाचा वापर करणे वा दफ्तर तपासणीच्या नावाखाली (कलम ८३) नोटिसा काढणे आणि या नोटिसांवरून चांगल्या पद्धतीने कार्य करणाऱ्या व्यवस्थापकीय समितीला विनाकारण त्रास देणे आदी प्रकार सध्या मोठ्या प्रमाणात सुरु आहेत. याबाबत ज्यांच्याविरुद्ध आदेश जारी करण्यात येत आहेत, त्यांची बाजू ऐकून घेतल्यानंतरही आपल्याला जे हवे तेच आदेश जारी केले जात आहेत. हे आदेश मान्य नसतील तर सहनिबंधकांकडे आव्हान द्या, अशा रीतीने या उपनिबंधकांची मनमानी वाढल्याचा अनुभव सहकारी गृहनिर्माण संस्थांतील पदाधिकारी घेत आहेत. वकिलासाठी पैसे खर्च करायचे आणि आपली बाजू भक्कमपणे मांडल्यानंतरही आदेश मिळेल, याची खात्री नसल्याची प्रतिक्रिया या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थेबद्दल एखादी तक्रार आली की, सुरुवातीला प्राथमिक चौकशी केली जाते. त्यात काही तथ्य आढळले तर सविस्तर चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र सहकार कायदा ८९ (अ) अन्वये दफ्तर तपासणीसाठी चौकशी अधिकारी नियुक्त केला जातो. या दफ्तर तपासणीत छोट्या मोठ्या त्रुटी आढळतात. त्याची पूर्तता करण्यास सांगितले जाते. या त्रुटींची पूर्तता न केल्यास वा काही आर्थिक गैरप्रकार आढळल्यास कलम ८३ अन्वये पुन्हा चौकशीचे आदेश जारी केले जातात. त्यानंतर कलम ८८ अन्वये चौकशी करुन जबाबदारी निश्चित केली जाते. ही सर्व कलमे म्हणजे उपनिबंधकांना अमर्याद अधिकार आहेत. बऱ्याचवेळा अशा तक्रारी आल्या तरी कानाडोळा करणारे उपनिबंधक काही वेळा क्षुल्लक तक्रारीतूनही टोकाची कारवाई करतात, असे दिसून येते. आपला आदेश पटला नसेल तर सहनिबंधकांकडे जा, असे सांगतात. पण सहनिबंधक असे किती आदेश मान्य करतात वा रद्द करतात, यावर संबंधित उपनिबंधकांची चौकशी व्हायला हवी. पण असा कुठलाच वचक नसल्याने उपनिबंधकांची मनमानी सुरु असते, असे सूत्रांनी सांगितले. याबाबत सहकार आयुक्त दीपक तावरे यांचा संपर्क होऊ शकला नाही. लघुसंदेशालाही त्यांनी प्रतिसाद दिला नाही. पुनर्विकासासाठी होणाऱ्या बैठकीसाठी प्राधिकृत अधिकारी नेमण्यासाठीही प्रति रहिवासी दर निश्चित करण्यात आलेला आहे. अन्यथा बैठकीसाठी परवानगीच दिली जात नसल्याचा अनुभव सध्या सहकारी गृहनिर्माण संस्था घेत आहेत. मुंबई ग्राहक पंचायतीचे कार्याध्यक्ष डि. शिरीष देशपांडे यांनी याबाबत सहकार आयुक्तांकडे तक्रारही केली होती. परंतु काहीही कारवाई झाली नाही. आजही म्हाडासह सर्वच उपनिबंधक कार्यालयांकडून बिनदिक्कतपणे अशी मागणी केली जात आहे.

# पोलीस ठाण्यातून आरोपीचा पळण्याचा प्रयत्न, पायाला दुखापत




**मुंबई:** अमली पदार्थ बाळगण्याच्या गुन्ह्यात अटक करण्यात असलेल्या एका आरोपीने पोलिसांना गुंगारा देत पहिल्या मजल्यावरून उडी घेत पळण्याचा प्रयत्न केल्याची घटना घाटकोपर पोलीस ठाण्यात घडली. त्यात आरोपीच्या पायाला दुखापत झाली असून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिस खान (३०) असे या आरोपीचे नाव असून तो घाटकोपर परिसरात राहणारा आहे. पोलिसांनी ३० जुलैला घाटकोपर परिसरातून त्याला दोन लाख रुपयांच्या अमली पदार्थांसह ताब्यात घेतले. त्याला पोलीस ठाण्यात आणल्यानंतर गुंडा विरोधी पथकाच्या खोलीत या आरोपीला ठेवण्यात आले होते. मात्र त्याचवेळी आरोपीने खोलीबाहेर धाव घेऊन, पहिल्या मजल्यावरून उडी घेत पळण्याचा प्रयत्न केला. मात्र तेथे असलेल्या पोलिसांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी तत्काळ आरडाओरडा केला. त्यानंतर इतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. पोलीस ठाण्याच्या पहिल्या मजल्यावरून उडी घेतल्याने त्याच्या डाव्या पायाला दुखापत झाली असून पोलिसांनी तत्काळ त्याला उपचारासाठी राजावाडी रुग्णालयात दाखल केले आहे.

# ठाण्यात शेठ बिल्डर विरोधात ग्राहकांचा आक्रोश, आठ वर्षे उलटूनही घरे मिळत नसल्याने ग्राहकांकडून घोषणाबाजी

**ठाणे** : येथील लक्ष्मी-चिरागनगर भागातील शेठ झुरी या बांधकाम प्रकल्पात सदनिका खरेदी करणाऱ्या ग्राहकांना दोन वर्षांची मुदत उलटूनही बिल्डरने सदनिकांचा ताबा दिलेला नाही. यामुळे आक्रमक झालेल्या ग्राहकांनी शनिवारी बांधकाम प्रकल्प कार्यालयात एकत्रित येऊन बिल्डरविरोधात घोषणाबाजी करत महारेरा कायद्यानुसार दिरंगाई भरपाई देण्याबरोबरच सदनिकांचा ताबा तातडीने देण्याची मागणी केली. दरम्यान, ठाणे पालिका आयुक्त सौरभ राव यांच्या कार्यालयात मंगळवारी रहिवाशी आणि विकासक यांची एक बैठक आयोजित करण्यात आली आहे. ठाणे येथील लक्ष्मी-चिरागनगर परिसरात शेठ झुरी या नावाचा बांधकाम प्रकल्प सुरू आहे. शेठ बिल्डर्समार्फत हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पात तीन टॉवर उभारण्यात येणार असून यातील एक टॉवर उभारण्यात



आलेला आहे. या प्रकल्पाच्या कार्यालयात शनिवारी अनेक ग्राहक जमले होते. बिल्डरकडून सदनिकांचा ताबा देण्यासाठी वारंवार नवीन तारखा देऊन फसवणुक केली जात असल्याचा आरोप करत ग्राहकांनी बिल्डर विरोधात घोषणाबाजी केली. तसेच बिल्डरकडून प्रतिसाद मिळत नसल्यामुळे ग्राहकांनी तिथेच ठिय्या मांडला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मतदार संघ असल्यामुळे त्यांनी या प्रकरणात लक्ष घालावे अशी मागणी ग्राहकांकडून करण्यात येत होती. याबाबत माहिती मिळताच स्थानिक आमदार प्रताप सरनाईक यांनी त्याठिकाणी जाऊन ग्राहकांचे म्हणणे ऐकून घेतले आणि या संदर्भात ठाणे पालिका आयुक्त सौरभ राव यांच्याशी चर्चा करून एक बैठक आयोजित केली. या बैठकीला ग्राहकांबरोबरच बिल्डर उपस्थित राहणार आहेत. या वृत्तास आमदार सरनाईक यांनी दुजोरा देत ग्राहकांना न्याय मिळवा, या उद्देशातून ही बैठक आयोजित केली असल्याचे त्यांनी सांगितले. २०१६ मध्ये या प्रकल्पाच्या बांधकामाला सुरुवात झाली. तीन वर्षात प्रकल्पाचे काम पुर्ण होणार असल्याचा दावा बिल्डरने केला होता. परंतु २०१७ मध्ये महारेरा कायद्यांतर्गत प्रकल्पाची नोंदणी करताना बिल्डरने २०२२ मध्ये प्रकल्पाचे काम पुर्ण होणार असल्याची नोंद केली. तसेच बिल्डरने सदनिकेसाठी ग्राहकांकडून टप्प्याटप्प्याने पैसे घेतले आणि ते देण्यास उशीर झाल्यावर व्याजही वसुल केले आहे. अनेकांनी सेवानिवृत्तीचे पैसे सदनिका घेण्यासाठी भरले आहेत. अनेकजण भाड्याच्या खोलीत राहत आहेत. काहीजणांनी सदनिकांचे पुर्ण पैसे दिले आहेत. तरीही त्यांना घराचा ताबा मिळत नाही. सदनिकांचा ताबा मिळण्यास पालिकेमुळे उशीर होत असल्याचा दावा बिल्डरकडून करण्यात येतो. तसेच दोन वर्षांची मुदत उलटूनही आम्हाला अजूनही सदनिकांचा ताबा देण्यासाठी तारीखच दिली जात असल्याचा आरोप ग्राहकांनी यावेळी केला. महारेरा आणि नियममाप्रमाणे प्रकल्पाचे काम सुरू आहे. करोनामुळे प्रकल्पास विलंब झाला होता. पालिकेकडून निवासयोग्य प्रमाणपत्र (ओसी) मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू असून ग्राहकांना तसे कळविले आहे. परंतु ग्राहकांमध्ये काहीतरी गैरसमज झाल्याने ते कार्यालयात येऊन आक्रमक झाले होते. -कमलेश शर्मा, ग्राहक सेवा अधिकारी, शेठ बिल्डर

# डोंबिवलीत पूर्ववैमनस्यातून रिक्षा चालकाची हत्या

**डोंबिवली** : डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकाजवळील रिक्षा वाहनतळावर रिक्षा रांगेत लावण्यावरून दोन रिक्षा चालकांमध्ये वाद झाला होता. या वादातून एका रिक्षा चालकाने दुसऱ्या रिक्षा चालकाची ठाकुर्ली खंबाळपाडा भागात शुक्रवारी रात्री धारदार शस्त्राने हत्या केली. टिळकनगर पोलीस ठाण्यात याप्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अश्विन बजरंग कांबळे (२८, रा. समतानगर झोपडपट्टी, गोळवली, डोंबिवली) असे खून झालेल्या रिक्षा चालकाचे नाव आहे. सुनील गोपाळ राठोड (३५, रा. डोंबिवली) असे खून करणाऱ्या रिक्षा चालकाचे नाव आहे. शुक्रवारी रात्री खंबाळपाडा प्रवेशव्दाराजवळ हा खून झाला. मयत अश्विनचा भाऊ आकाश कांबळे याने याप्रकरणी टिळकनगर पोलीस ठाण्यात तक्रार केलीआहे. आकाश नोकरी करतो. आकाश यांचा अश्विन हा लहान भाऊ होता. पोलिसांनी सांगितले, मयत अश्विन बजरंग कांबळे आणि सुनील राठोड हे दोघेही रिक्षा चालक आहेत. ते




डोंबिवली रेल्वे स्थानक ते खंबाळपाडा भागात रिक्षेने प्रवासी वाहतूक करून उपजीविका करतात. डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकाजवळील रिक्षा वाहनतळावर रिक्षा रांगेत उभे करण्यावरून अश्विन आणि सुनील राठोड यांच्यात वाद झाला होता. माझा क्रमांक रांगेत असताना तू मध्ये का घुसला. यामुळे प्रवासी मिळण्यास आता उशीर होईल, असे या भांडणाचे किरकोळ कारण होते. या वादातून त्यांच्यात धुसफूस सुरू होती. सुनीलने अश्विनला धडा शिकवण्याचा निर्णय घेतला होता. मयत रिक्षा चालक अश्विन कांबळे शुक्रवारी रात्री खंबाळपाडा प्रवेशव्दार येथून रिक्षा घेऊन जात असताना सुनील राठोडने ते पाहिले. राठोडने आपली रिक्षा तात्काळ मागे फिरवून त्याने अश्विनच्या रिक्षेचा पाठलाग सुरू केला. अश्विनला खंबाळपाडा प्रवेशव्दाराजवळ गाठले. तेथे त्याच्याशी भांडण उकरून काढून सुनीलने रिक्षेतील लोखंडी सळई बाहेर काढून अश्विन कांबळेला काही कळण्याच्या आत त्याच्यावर लोखंडी सळईने प्रहार करून त्याला जागीच ठार मारले. अचानक घडलेल्या या प्रकाराने परिसरातील दुकानदारांनी घाबरून दुकाने बंद केली. पादचारी परिसरातून पळून गेले. एकही पादचारी हा प्रकार सुरू असताना अश्विनच्या बचावासाठी पुढे आला नाही. टिळकनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार कदम यांना ही माहिती समजात ते तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ यांनी घटनास्थळी भेट दिली. अश्विनला तातडीने पालिका रुग्णालयात नेण्यात आले. तत्पूर्वीच तो मरण पावला होता. कल्याण, डोंबिवलीतील बहुतांशी रिक्षा चालकांच्या रिक्षांमध्ये लोखंडी सळई, लाकडी दांडके, स्टम्प लपवून ठेवलेले असतात. वाहन कोंडी किंवा इतर वाहन चालकाशी वाद झाला की मग हे रिक्षा चालक ही अवजारे बाहेर काढून त्याचा उपयोग हाणामारीसाठी करतात. वाहतूक पोलीस, पोलीस आणि आरटीओ अधिकाऱ्यांनी रिक्षा चालकांच्या वाहनाची तपासणीची मोहीम सुरू करून अशाप्रकारची अवजारे रिक्षेत ठेवणाऱ्या चालकांवर कारवाईची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# कल्याणमधील खडेगोळवली येथील विठ्ठल मंदिरात चोरी

**कल्याण** : कल्याण पूर्व भागातील खडेगोळवली भागातील राधा कृष्ण मंदिरातील चोरीची घटना ताजी असताना, याच भागातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात चोरी करून चोरट्यांनी १५ हजार रूपयांची वहाणावळ, १४ पितळेची भांडी चोरून नेली आहेत. घरफोड्यांबरोबर चोरट्यांनी आता आपला मोहरा मंदिरांकडे वळविल्याचे चित्र आहे. खडेगोळवली पोलीस चौकीच्या मागे विठ्ठल रुक्मिणी मंदिर आहे. परिसरातील भाविक नियमित या मंदिरात दर्शनासाठी येतात. चोरट्याने या मंदिरावर पाळत ठेऊन



मंदिराचा मुख्य प्रवेशमार्गातील दरवाजा धारदार कटावणीने उघडून मंदिरात प्रवेश केला. मंदिराच्या प्रदक्षिणा मार्गात असलेली दानपेटी, मंदिराच्या गर्भगृहाजवळील खोलीत देवासाठी लागणारे ताम्हण, पंचपाळ, भजनासाठी लागणाऱ्या टाळ, चकवा, आरतीपत्र अशी एकूण पितळेची १२ भांडी चोरट्याने चोरून नेली. सकाळी नेहमीप्रमाणे पुजारी मंदिर उघडण्यासाठी आला त्यावेळी त्यांना मंदिराचा मुख्य दरवाजा तोडला असल्याचे आणि मंदिरात चोरी झाले असल्याचे दिसले. पुजाऱ्याने ही माहिती तातडीने या मंदिराचे खजिनदार जगदीश बाळकृष्ण तरे यांना दिली. चोरट्याने १५ हजार रूपयांचा ऐवज मंदिरातून चोरून नेला आहे. परिसरातील सीसीटीव्ही चित्रण तपासले असताना मंदिराच्या विश्वस्तांना एक अस्पष्ठ स्वरूपात दिसणारा एक इसम रात्रीच्या वेळेत मंदिरात चोरी केली असल्याचे दिसत आहे. या चित्रणाच्या आधारे जगदीश तरे यांनी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक एच. एल. शिर्के याप्रकरणाचा तपास करत आहेत. गेल्या वर्षभरात डोंबिवली, कल्याणमधील सात ते आठ मंदिरांमध्ये चोऱ्या होऊन मंदिरांमधील दानपेट्या चोरट्यांनी चोरून नेल्या आहेत.

## संपादकीय


संपादक : अनिल राजाराम पवार

# अश्रूंची झाली फुले !

अनुसूचित जातींना सध्या मिळणारे १५ टक्के आरक्षण या वर्गातल्या सर्वच जातींपर्यंत पोहोचावे, यासाठी या आरक्षणाचे राज्य सरकारांनी जातिनिहाय उपवर्गीकरण करावे; असा ऐतिहासिक निकाल देऊन सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने आरक्षणाचे धोरण अधिक तर्कसंगत केले आहे. सामाजिक न्यायाची घटनाकारांना अभिप्रेत असणारी प्रक्रिया याने ढोबळ न राहता सूक्ष्म व अचूक होईल. आधुनिक शेतीत खतांचा बेसुमार व सरसकट वापर न करता प्रत्येक पिकाच्या किंवा अगदी रोपाच्याही गरजेप्रमाणे सूक्ष्म सिंचन आणि सूक्ष्म खतशिंपण करतात. ही पद्धत सर्वच पिकांच्या हिताची तसेच वाढीस पोषक असते. तेच इथेही लागू होते. अनुसूचित जातींच्या एकूण आरक्षणात आपल्या जातीला वेगळा उप-वाटा मिळावा, यासाठी कर्नाटक, आंध्र, तेलंगण आणि अल्प प्रमाणात तामिळनाडूत वास्तव्य करणाऱ्या माडिगा समाजातील कार्यकर्ते मंदकृष्ण माडिगा हे गेली तीन दशके लढत होते. माडिगा म्हणजे चर्मकार समाज. अनुसूचित जातींच्या आरक्षणात आपल्या समाजावर अन्याय होतो आहे; ही माडिगा रिझर्व्हेशन पूर्त समितीची हाक न्यायव्यवस्थेने ऐकायला आणि त्यावर अंतिम निकाल द्यायला इतका काळ लागला. मंदकृष्ण माडिगा यांनी न्याय मिळेपर्यंत फक्त काळीपांढरी वस्त्रे परिधान केली. आता त्यांच्या चार राज्यांमध्ये पसरलेल्या समाजाच्या जीवनात या निकालाने नवे रंग भरले जातील. त्यांनी आता रंगबिरंगी कपडे घालावेत ! या निकालाने आरक्षणातील आरक्षण या कळीच्या मुद्द्याची विधायक चर्चा सुरू व्हावी. सध्याची तणावपूर्ण सामाजिक स्थिती पाहता ती महाराष्ट्रासाठीही हितकर ठरेल. भारतातील जातिव्यवस्था जितकी गुंतागुंतीची, व्यामिश्र आणि बहुस्तरीय उतरंडीची आहे; तितकेच तिच्यावर इलाज करणारे आरक्षणाचे धोरण जास्तीत जास्त अंतर्विरोधांना थेट भिडणारे असायला हवे होते. तसे ते नव्हते आणि नाही. माडिगा जमातीच्या निदान सहा पोटजाती आहेत. शिवाय, सातवी माडिगा दासू ही समाजाची पुरोहित म्हणता येईल अशी पोटजात. हीच स्थिती देशातल्या काही हजार जातींची आहे. गेल्या वर्षी तेलंगणच्या प्रचार मोहिमेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आलिंगन दिले तेव्हा मंदकृष्ण माडिगा यांच्या डोळ्यांतून तप्त अश्रू वाहू लागले. त्या अश्रूंची या निकालाने फुले झाली आहेत ! मात्र, त्या अश्रूंची वेदना व अर्थ पंतप्रधान आणि केंद्र सरकार यांना समजत असेल तर त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता देशात जनगणना आणि तीही जातिगणनेसहित करायला हवी. या निकालात सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरणाची जबाबदारी राज्य सरकारांवर सोपविली आहे. ही राज्यांमधील प्रक्रिया प्रामाणिक आणि पारदर्शक व्हावयाची असेल तर देशव्यापी जातगणनेला कोणताही पर्याय नाही. ऐक्याच्या भ्रामक कल्पना उराशी कवटाळून जातिगणनेला विरोध करणारे देशाचे अतोनात नुकसान करीत आहेत. सगळे अंतर्विरोध दाबून-दामटून नव्हे तर त्यांना उचित न्याय व अवकाश देऊन जिरवायचे असतात. या निकालाचा हा अर्थ सगळ्यांनी, विशेषत: सर्व राज्यकर्त्यांनी समजावून घ्यावा. हा निकाल देणारे घटनापीठ सात जणांचे असले तरी सगळी निकालपत्रे वेगळी आहेत. मात्र, यातल्या न्या. बेला त्रिवेदी या एकट्याच अनुसूचित जाती हा एकजिनसी समाज मानतात. हे अनैतिहासिक आकलन वगळता न्या. भूषण गवई यांचे अनुसूचित जाती आरक्षणातही क्रिमी लेअरचा समावेश करावा, हे प्रतिपादन, तसेच न्या. पंकज मिथल यांचा एका पिढीला आरक्षण मिळाले असेल व त्या पिढीची पुरेशी प्रगती झाली असेल तर पुढच्या पिढीला आरक्षण मिळता कामा नये, हा दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचे आहेत. यावर गंभीर राष्ट्रीय परिचर्चा व्हायला हवी. ती निर्विष होण्यासाठी दलित नेतृत्वाने पुढाकार घेण्याची गरज आहे. या निकालातून ओबीसींच्या पोटवर्गवारीचे काय, असा प्रश्न पुन्हा ऐरणीवर येईल. उत्तर प्रदेश सरकारने यासाठी राघवेंद्र कुमार यांचे मंडळ नेमले होते. त्याचा अहवाल सन २०१८पासून पडून आहे. मोदी सरकारने या कामासाठी आदल्याच वर्षी न्या. गोरला रोहिणी यांचा आयोग नेमला होता. या आयोगाने इतर मागासवर्गाच्या आरक्षणाचे उप-वाटे कसे करायचे, याचा सविस्तर अहवाल केंद्र सरकारला सन २०२३ मध्ये सादर केला. त्याचे नेमके काय करायचे, सरकारने ठरविले आहे? हा अहवाल जाहीर व्हावा, यासाठी आलेली याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयाने अलीकडे फेटाळली असली तरी तिच्यातून लोकभावना लक्षात येते. आधीच या आयोगाला १३ मुदतवाढी मिळाल्या होत्या. ओबीसींमधील केवळ एक टक्का वर्गाने सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमधील ५० टक्के जागांवर कब्जा केला आहे; असे रोहिणी आयोगाला आढळल्याचे म्हणतात. हे खरे असेल तर न्यायातील अन्याय किती घनघोर असू शकतो, याचे प्रत्यंतर येते.

# एमपीएससी मंत्र: गट ब अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा; माहिती अधिकार व लोकसेवा हक्क

गट ब अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षेच्या पेपर दोन मधील माहिती अधिकार अधिनियम, २००५ आणि लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ यांची तयारी कशी करावी ते या लेखामध्ये पाहू. कोणत्याही प्रशासकीय अधिनियमाचा अभ्यास करताना सामान्यत: अधिनियमाची पार्श्वभूमी, महत्त्वाच्या व्याख्या, निकष, अर्जदार/ तक्रारदार, अपीलीय प्राधिकारी, निर्णय देण्याची/ कार्यवाहीची कालमर्यादा, तक्रारी/ अपीलासाठीची कालमर्यादा, दंड/ शिक्षेची तरतूद, अंमलबजावणीची प्रक्रिया विहीत मुदती, अंमलबजावणी व देखरेखीसाठी नमूद यंत्रणा, नमूद केलेले अपवाद हे मुद्दे प्रामुख्याने लक्षात घ्यावे लागतात. माहिती अधिकार व लोकसेवा हक्क या दोन्ही प्रशासकीय अधिनियमामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाने करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या तरतुदी समाविष्ठ आहेत. यांची तयारी करताना अधिनियमांच्या मूळ व अद्यायावत प्रतींचाच वापर करावा. तयारी पुढीलप्रमाणे करता येईल: अधिनियमातील लोकसेवा, निर्देशित अधिकारी, सार्वजनिक प्राधिकरण, सेवा हक्क, विहीत कालमर्यादा यांच्या व्याख्या बारकाईने समजून घ्याव्यात. अधिनियमाची मुख्य कलमे आहेत क्रमांक ३ ते ७. ही कलमे व्यवस्थित समजून घेऊन त्यांचा बारकाईने उदाहरणासहीत अभ्यास करावा. लोकसेवा पुरविण्यासाठीच्या कालमर्यादा ठरविण्याचे निकष, अपवाद समजून घ्यावेत. अपीलाचे सर्व तिन्ही स्तर व्यवस्थित समजून घ्यावेत. प्रत्येक स्तरावरील अपीलासाठीची कालमर्यादा, प्रत्येक स्तरावरील निर्णयासाठी निश्चित केलेली कालमर्यादा, कारवाईचे स्वरूप यांच्या तुलनात्मक टेबलमध्ये नोट्स काढल्यास हे मुद्दे लक्षात ठेवणे सोपे होईल. लोकसेवा हक्क आयोगाबाबत आयोगाची रचना, आयोगावर नियुक्तीची अर्हता, नियुक्तीची प्रक्रिया, आयुक्त व सदस्यांचा पदावधी, वयोमर्यादा, पदावरुन हटविण्याची प्रक्रिया, आयोगाची कर्तव्ये, अधिकार हे मुद्दे पाठच करावेत. या कायद्यातील पुढील महत्त्वाच्या तरतुदी नेमकेपणाने समजून घ्याव्यात : निर्देशित अधिकारी



व प्रथम अपिलीय अधिकारी यांना दंड ठोठावण्याची तरतूद, वारंवार सेवा बजावण्यात कुचराई करणाऱ्या निर्देशित अधिकाऱ्यावर शिस्तभंगविषयक कारवाईची तरतूद, कलम २० अंतर्गत विहीत वेळेत लोकसेवा देण्याची संस्कृती विकसित करण्यबाबतची तरतूद.

**माहिती अधिकार अधिनियम, २००५**

या अधिनियमाची तयारी करताना अधिनियमामागचा उद्देश समजून घेतला तर त्यातील व्याख्या, तरतुदी, अपवाद यांमागील कारणे लक्षात येतील. हा कार्यकारण भाव लक्षात घेतला तर अधिनियमातील सगळीच कलमे व्यवस्थित समजून घेता येतात आणि बरेच वेळा काही प्रश्न कामन सेन्स वापरुनही सोडविता येतात. अधिनियमातील सार्वजनिक प्राधिकरण, माहिती, अभिलेख, माहितीचा अधिकार यांच्या व्याख्या बारकाईने समजून घ्यायला हव्यात. सार्वजनिक प्राधिकरणाने स्वत:च घोषित करावयाच्या माहितीची अधिनियमामध्ये नमूद केलेली यादी लांबलचक आहे. तरीही त्यातील मुद्द्यांमागचे लाजिक समजून घेतले तर लक्षात ठेवता येते आणि त्याबाबत प्रश्न विचारला गेला तर कामन सेन्सने उत्तर देता येते. माहिती अर्ज निकाली काढण्यासाठी कलम ७ मध्ये विहीत केलेली कार्यवाही समजून घ्यावी. यातील माहिती देणे, माहिती नाकारणे आणि अर्ज हस्तांतरीत करणे या तिन्ही बाबतीत करावयाची कार्यवाही, याबाबतच्या कालमर्यादा माहित असायला हव्यात. अर्ज हस्तांतरीत करणेबाबत्ची कार्यवाही कलम ६ मध्ये देण्यात आली आहे. तीही व्यवस्थित समजून घ्यावी. माहिती नाकारण्याबाबतचे कलम ८ आणि माहिती अधिकार कायदा लागू नसलेल्या संस्थांबाबतचे कलम २४ यांचा बारकाईने अभ्यास आवश्यक आहे. कलम ८ मधील अटी आणि अपवाद, कलम १० मधील तरतुदी आणि कलम २४ मधील तरतुदी आणि अपवाद व्यवस्थित माहीत करुन घ्यावेत. या सर्व कलमांची लिंक लावून अभ्यास केल्यास तयारी जास्त चांगली होईल. अपीलाचे दोन्ही स्तर तसेच प्रत्येक स्तरावरील कालमर्यादा, कारवाईचे स्वरूप व्यवस्थित समजून घ्यावेत. दंडाबाबतच्या तरतुदी समजून घ्याव्यात. केंद्रीय व राज्य माहिती आयोगाबाबत तुलनात्मक टेबलमध्ये पुढील मुद्द्यांचा आढावा घेता येईल: आयोगाची रचना, आयोगावर नियुक्तीची अर्हता, नियुक्तीची प्रक्रिया, आयुक्त व सदस्यांचा पदावधी व वयोमर्यादा, पदावरुन हटविण्याची प्रक्रिया, आयोगाची कर्तव्ये, अधिकार. दोन्ही अधिनियमांमधील कार्यवाहीसाठीच्या कालमर्यादा, अपिलाचे स्तर आणि प्रत्येक स्तरावरची कार्यवाही, आयोगांबाबतच्या तरतुदी, दंडाची तरतूद, वार्षिक अहवाल या समान मुद्द्यांबाबतच्या तरतुदींच्या नोट्स तुलनात्मक टेबलमध्ये काढल्या तर हे मुद्दे लक्षात राहणे सोपे होईल.

# कडोंमपातील खंडणीखोर कामगार विनोद लकेश्री निलंबित, आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांची कठोर कारवाई

**कल्याण** : विकासकाकडून रोख, सदनिकांच्या स्वरुपात खंडणी घेण्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल झालेला कल्याण डोंबिवली पालिकेच्या घनकचरा विभागातील वाहनचालक कामगार विनोद मनोहर लकेश्री यांना शुक्रवारी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त वंदना गुळवे यांनी दाखल केलेल्या प्रस्तावावरून निलंबित केले. महाराष्ट्र नागरी सेवा व शिस्त नियम १९७९ मधील नियम ४(१) प्रमाणे प्रशासनाने कामगार लकेश्री यांच्यावर ही कारवाई केली. पालिकेतून निलंबित होण्याची त्यांची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी पालिकेच्या डोंबिवली विभागीय कार्यालयाच्या आवारात माघी गणेशोत्सवानिमित्त आयोजित एका सांस्कृतिक कार्यक्रम जाहीरपणे बक्षिसरुपाने पैसे उधळल्याने अनेक कर्मचारी निलंबित झाले होते. त्यामध्ये विनोद यांचाही सहभाग होता. ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागानेही त्यांची चार वर्षांपूर्वी चौकशी केली होती. काही महिन्यांपूर्वी त्यांच्यावर पालिकेच्या डोंबिवली विभागीय कार्यालयासमोर भूमाफियांकडून जीवघेणा हल्ला झाला होता. त्यातून ते सुदैवाने बचावले होते. डोंबिवलीतील बेकायदा बांधकामांशी त्यांचे नाव नेहमीच जोडले जात होते. या हल्ल्यानंतर अलीकडे लकेश्री यांनी पोलीस आयुक्तांकडे आपल्या जीवाला काही जणांकडून धोका असल्याची, तसेच एक वाहन आपले नियमित पाठलाग करते अशी तक्रार केली होती. त्या अनुषंगाने ठाणे पोलिसांनी चौकशी



सुरू केली होती. या तपास प्रक्रियेतून हा खंडणीचा प्रकार उघडकीला आला आहे. विकासक प्रफुल्ल गोरे यांनी डोंबिवलीत विविध भागात सुरू असलेल्या आपल्या गृहप्रकल्पांच्या तक्रारी कामगार विनोद लकेश्री यांच्यासह वसंत शंभरकर, प्रशांत शिंदे, माहिती कार्यकर्ते महेश निंबाळकर यांनी पालिका, शासनाकडे केल्या. आपल्या गृहप्रकल्पांची छायाचित्रे समाज माध्यमांमध्ये प्रसारित करून आपली आपल्या गृहप्रकल्पांमध्ये घर खरेदी होणार नाही अशा पद्धतीने आपली कोंडी केली. या तक्रारी मागे घेण्याच्या माध्यमातून आरोपींनी आपल्याकडे रोख ४१ लाख रुपये आणि पाच सदनिका खंडणीरुपाने घेतल्या आहेत, अशी तक्रार ठाणे खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मालोजी शिंदे यांच्याकडे केली होती. या प्रकरणाचा तपास सुरू होताच, लकेश्री आणि इतर दोन जण फरार झाले. गेल्या वीस दिवसांपासून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. सकृतदर्शनी सबळ पुरावे असल्याने पोलिसांनी लकेश्री यांच्यासह इतर आरोपींवर विष्णुनगर पोलीस ठाण्यात मंगळवारी खंडणीचा गुन्हा दाखल केला. या खंडणी प्रकारात पालिका कर्मचारी सहभागी असल्याने पालिकेच्या प्रतीमेला धक्का आणि पालिकेची बदनामी झाल्याने आयुक्त डॉ. जाखड यांनी सामान्य प्रशासन उपायुक्त गुळवे यांना लकेश्री यांना तातडीने सेवेतून निलंबित करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाप्रमाणे शुक्रवारी लकेश्री यांना पालिका सेवेतून निलंबित करण्यात आले. ही कारवाई म्हणजे अतिक्रमण नियंत्रण, फेरीवाला हटाव पथक, घनकचरा विभागातील कामगारांना मोठा इशारा आहे.

कामगार विनोद लकेश्री यांच्यावर विष्णुनगर पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल झाल्याने त्यांच्यावर आयुक्तांनी महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त नियमाने निलंबनाची कारवाई केली आहे. निलंबन काळात त्यांची उपस्थिती पालिका मुख्यालयात राहील. वंदना गुळवे, उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग.

# प्राध्यापिकेला चिरडणारा तरुण मद्यधुंद असल्याचे स्पष्ट

**वसई** : वसई- विरारच्या गोकुळ टाऊनशीप येथे प्राध्यापिका आत्मजा कासाट यांना धडक देणारा चालक शुभम पाटील (२४) हा मद्याच्या नशेत असल्याचे वैद्यकीय तपासणीत स्पष्ट झाले आहे. त्याच्यावर अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरूवारी संध्याकाळी झालेल्या अपघाता प्रा आत्मजा यांचा मृत्यू झाला होता. विरारच्या विवा कनिष्ठ महाविद्यालयात प्रा. आत्मजा कासाट या इंग्रजीच्या प्राध्यापिका म्हणून कार्यरत होत्या. गुरुवारी संध्याकाळी महाविद्यालय सुटल्यावर त्या गोकुळ टाऊनशीप येथील घरी जाण्यासाठी निघाल्या होत्या. त्यावेळी मुलजीभाई मेहता शाळेजवळ मागून येणाऱ्या फॉर्च्युनर गाडीने त्यांना धडक दिली होती. या धडकेत गंभीर जखमी असलेल्या प्रा. आत्मजा यांना विरारच्या प्रकृती या खासगी रुग्णालयात दाखळ करण्या रात्री दहाच्या सुमारास मृत्यू झाला होता. फॉर्च्युनर गाडी शुभम पाटील (२४) नावाचा तरूण चालवत होता. अपघात घडला तेव्हा गाडीत त्याचा





मित्र आणि अन्य दोन तरूणी होत्या. ते सर्व मद्याच्या नशेत होते. नवीन विवा महाविद्यालयाजवळ गाडीत ते मद्यपान करत होते, अशी माहिती अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पाटील यांनी दिली.आरोपी शुभम पाटील याच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस उपायुक्त (परिमंडळ ३) जयंत बजबळे यांनी दिली. आरोपी हा डोंगपाडा येथे राहणारा असून व्यावसायिकाचा मुलगा आहे. त्याच्या वडिलांचा खदाणीचा व्यवसाय आहे.

अपघात घडला तेव्हा आमदार हितेंद्र ठाकूर यांचा मुलगा शिखर ठाकूर आपल्या मित्रांसमवेत जात होता. तेव्हा त्यांना प्रा. आत्मजा रस्त्यावर पडलेल्या दिसल्या. त्यांनी त्याच गाडीतून त्यांना रुग्णालयात दाखल केले. तेव्हा त्या शुध्दीत होत्या. त्यांना वाचविण्यासाठी डॉक्टरांशी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र रात्री साडेनऊच्या सुमारास डॉक्टरांनी त्यांना मयत घोषीत केले. दरम्यान, या घटनेमुळे वसई विरार शहरातील संतापाची लाट पसरली आहे. प्रा. आत्मजा या सामाजिक क्षेत्रात सक्रीय होत्या. त्या विवा कनिष्ठ महाविद्यालयात इंग्रजी विषय शिकवत होत्या. त्यांच्या या दुर्देवी मृत्यूबद्दल महाविद्यालयाचे विश्वस्त संजीव पाटील यांनी शोक व्यक्त केला आहे. गुरूवारी प्रा आत्मजा यांनी आपल्या मोबाईलवर स्वामी समर्थांचा फोटो ठेऊन आरंभ तू अंत तू, शून्य मी..अनंत तू असा मेसेज ठेवला होता. माणसाचं आयुष्य किती क्षणभंगुर आहे ते या संदेशातून स्पष्ट होत असल्याने या स्टेटसची चर्चा होत आहे.

# १०० कोटी रुपयांच्या कर्जाच्या अमिषाने लाखो गमावले





**ठाणे** : व्यवसायासाठी १०० कोटी रुपयांचे कर्ज मिळवून देतो असे सांगून मुंबईतील एका व्यवसायिकाची ५३ लाख रुपयांना फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुंबईमध्ये व्यवसायिकाची कंपनी आहे. त्यांचा रस्ते निर्माण करणे आणि रियल इस्टेटचा व्यवसाय आहे. सुमारे दोन वर्षांपूर्वी एक महिला त्यांच्या कार्यालयात लायझनिंगच्या कामासाठी आली होती. व्यवसायिकाला १०० कोटी रुपयांचे कर्ज हवे होते. त्यामुळे महिलेने जमिनीच्या नावाने कर्ज काढून देणाऱ्या व्यक्तीची ओळख व्यवसायिकाच्या कर्मचाऱ्यांसोबत करून दिली होती. व्यवसायिकाची रायगडमध्ये १०० एकर जमीन आहे. या जमिनीवर कर्ज मिळू शकेल असे त्या व्यक्तीने सांगितले. कर्ज काढून देणाऱ्या व्यक्तीने कर्ज काढण्याच्या प्रक्रियेसाठी ४८ लाख रुपये आणि पाच लाख रुपये वकिलांचे शुल्क असे ५३ लाख रुपये मागितले. त्यानुसार त्यांनी टप्प्याटप्प्याने ५३ लाख रुपये पाठविले. परंतु दोन वर्ष उलटूनही त्यांना कर्ज मंजूर झाले नव्हते. त्यामुळे व्यवसायिकाच्या कर्मचाऱ्याने याप्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. कर्मचाऱ्याने ज्या बँकेतून कर्ज प्राप्त होणार होते. त्या बँकेत विचारले असता, कोणतीही माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही. अखेर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


# वसतीगृहामधे अनधिकृतपणे राहणाऱ्या व्यक्तिना काढुन टाकण्याबाबत तसेच अधिकृत विद्यार्थ्यांच्या वार्षिक फी भरण्यास सवलत










शिवसेना
शाखा क्र. १८१
संजय बन्सी रणदिवे शाखाप्रमुख
(स्वामी पॉल) विधानसभा समन्वयक
(सुशांत जोशी) शाखा प्रमुख-१८०
(संजय रणदिवे) शाखा प्रमुख-१८१
पृथ्वीराज निवास, लक्ष्मण वाडी, कोरबा मिठागर, वडाळा (पूर्व), मुंबई - ४०० ०३७.

मुंबई : वसंतदादा पाटील प्रतिष्ठान संचालित डॉ.पंजाबराव देशमुख मुलांचे वसतीगृह,वडाळा ॲन्टॉप हिल या वसतीगृहामध्ये राहत असलेल्या विद्यार्थ्यांना वसतीगृहाची वार्षिक फी ६४०००/ – रुपये एक रक्कमी भरण्याची सक्ती करण्यात येत असुन ही फी भरण्यासाठी त्यांना ४ टप्प्यांची सवलत द्यावी. त्यांच्यावर सक्ती करु नये.त्याच बरोबर सदरचे वसतीगृह हे आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांसाठी असुनही येथे वसंतदादा पाटील प्रतिश्ठानचे दहा शिक्षक अनधिकृत पणे राहत असुन त्यांना ताबडतोब वसतीगृहातुन काढुन टाकण्यात यावे.त्यांच्यामुळे खऱ्या अर्थाने लाभार्थी असलेल्या विद्यार्थ्यांची संधी हुकली आहे.तसेच येथे एक दुधवाला देखील त्याचे सामान वसतीगृहात ठेवत असुन त्याला ही बाहेर काढावे. दुसरी बाबा सदर वसतीगृहामध्ये मोठया प्रमाणात अस्वच्छता असुन त्याची साफ सफाई करावी.जेणे करुन उंदिर त्या ठिकाणी फिरणार नाहीत.तसेच तुटलेल्या खिडक्यांची व लाईटीची दुरुस्ती करावी. तरी या बाबींची गांर्भियाने विचार करुन त्वरीत योग्य ती कारवाई करावी. सहकार्याच्या अपेक्षेसह धन्यवाद!

आपले स्नेही

स्वामी पॉल (विधानसभा समन्वयक)

सुशांत जोशी (शाखा प्रमुख १८०)

संजय आशा बन्सी रणदिवे (शाखा प्रमुख १८१)

## चोरीसाठी विमानानं मुंबईत यायचा, ड्रेनेजच्या पाईपात राहायचा आणि चोरीनंतर पुन्हा विमानानंच पसार व्हायचा !

**ठाणे** : ठाणे पोलिसांनी ठाण्याच्या वागळे इस्टेट परिसरात एका चोराला अटक केली आहे. पण त्याचा तपास केल्यानंतर हा एखादा साधा चोर नसून हाय प्रोफाईल चोर असल्याचं पोलिसांच्या लक्षात आलं. कारण मुंबई, ठाण्यात चोरी करण्यासाठी हे चोर महाशय चक्क विमानानं मुंबईत दाखल व्हायचे, एका ड्रेनेजच्या पाईपात राहायचे आणि पुन्हा विमानानेच आपल्या घरी परतायचे! ही बाब उघड झाली तेव्हा पोलीसही काही काळ चक्रावले. सध्या या चोराची कसून चौकशी केली जात असून त्याच्या इतर गुन्ह्यांचाही तपास पोलीस करत आहेत. ठाणे पोलिसांनी वागळे इस्टेट भागात गेल्या आठवड्यात अर्थात २५ जुलै रोजी एका चोराला अटक केली. राजू मोहम्मद जेनाल शेख उर्फ बंगाली असं या चोराचं नाव होतं. हा चोर या भागातल्या एका ज्वेलरकडे चोरलेले सोन्याचे दागिने विकण्यासाठी आला होता. पोलिसांना याची खबर आधीच लागली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून या चोराला अटक केली. पण त्यानंतर समोर आलेल्या माहितीमुळे पोलिसांना या चोर महाशयांच्या पार्श्वभूमीचा थांगपत्ता लागला! राजू मोहम्मद जेनाल शेख उर्फ बंगाली हा मूळचा त्रिपुराचा रहिवासी आहे. बंगाली फक्त चोरी करण्यासाठी त्रिपुराहून थेट मुंबईपर्यंत चक्क विमानानं यायचा. ठाण्याच्या आसपासच्या भागात एका ड्रेनेजच्या पाईपमध्ये बंगाली वास्तव्य करायचा. यानंतर आसपासच्या भागात जिथे चोरी करायची आहे, त्या घरांची रेकी करायचा. योग्य वेळ साधून बंगाली तिथे हात साफ करायचा. चोरी केलेला माल स्थानिक बाजारात व्यापार्य़ांना विकून पुन्हा ऐटीत विमानानंच बंगाली त्रिपुराला परत जायचा! बंगालीनं आत्तापर्यंत किमान सात वेळा अशाच प्रकारे त्रिपुरा ते त्रिपुरा व्हाया मुंबई प्रवास करून चोऱ्या केल्या आहेत. बंगाली पकडला गेला तेव्हा त्याच्याकडे सोन्याचे दागिने आणि १.१३ लाख रुपयांची रोकड पोलिसांना सापडली. बंगालीविरुद्ध महाराष्ट्राप्रमाणेच गुजरातच्याही काही भागात चोऱ्या केल्याचे गुन्हे दाखल आहेत.

## वसई पालिका उपायुक्त अजित मुठे यांच्यावर भूमाफियांचा हल्ला

**वसई** : वसई विरार महापालिकेचे उपायुक्त अजित मुठे यांच्यावर भूमाफियांनी हल्ला केला. बुधवारी संध्याकाळी नायगाव पूर्वेच्या पोमण शिलोत्तर भागात ही घटना घडली. वसई विरार महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे प्रमुख असलेले उपायुक्त अजित मुठे हे बुधवारी दुपारी आपल्या पथकासह नायगाव पूर्वेच्या पोमण शिलोत्तर येथे कारवाई करण्यासाठी गेले होते. या ठिकाणी भूमाफियांनी बेकायदेशीररित्या



अनधिकृत बांधकाम केले होते. ही कारवाई करत असताना भूमाफियांनी अचानक मुठे यांच्यावर हल्ला चढवला. यात मुठे यांना किरकोळ दुखापत झाली. नंतर पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तो पर्यत मुठे यांनी भूमाफियांचे अकरा हजार चौरस किलोमीटर अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त केले होते.

OWNER, PRINTER, PUBLISHER & EDITOR BY ANIL RAJARAM PAWAR PRINTED AT M/S SOMANI PRNITING PRESS, UNIT NO.04, GROUND FLOOR, N.K. INDUSTRIAL ESTATE, OFF AREY ROAD, NEAR PARVASI IND. ESTATE, GATE NO. 2, GOREGAON EAST, MUMBAI-400063, & PUBLISH AT M/81, MARIAMMA NAGAR, WORLI, DR A.B. ROAD,BEHIND NEHRU CENTRE, WORLI MUMBAI - 400018. MAHARASHTRA , Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789 , Mob. 9867110318

मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक अनिल राजाराम पवार यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.४, ग्राउंड फ्लोअर, आरे रोड, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेट, गेट नं. २, गोरेगाव (पूर्व) मुंबई - ४०००६३ महाराष्ट्र येथून मुद्रित, एम/८१,मरिम्मा नगरए वरळी, डॉ. ए.बी. रस्ता, नेहरु सेंटरच्या मागे, वरळी,मुंबई ४०००१८, महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. मो. ९८६७११०३१८, Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789